04 APR 2026

लोकमत

# दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी : अविनाश सांगोलेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते, असे प्रतिपादन डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे आयोजित डॉ. दु.का. संत व्याख्यानमालेंतर्गत 'डॉ. दु. का. संत : जीवन आणि कार्य' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, दु. का. संत संशोधनातील पहिल्या पिढीचे अग्रदूत आहेत. या व्याख्यानासाठी विशेष उपस्थित असणारे दु. का. संत यांचे चिरंजीव उदयप्रकाश संत यांनी संत यांच्या आठवणींना उजाळा दिला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, दु. का. संत यांचे लेखन आजच्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहे. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत, अभिजित पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे उपस्थित होते.

0 4 APR 2026 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॅरी ऑनचे निकाल जाहीर होणार

## अंतिम निर्णय न्यायालयावर अवलंबून : विद्यापीठाच्या विशेष प्रवेश संधीतून प्रवेश घेतलेल्यांचे निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष 2025-26 अंतर्गत 'कॅरी ऑन' (विशेष प्रवेश संधी) योजनेतून प्रवेश घेऊन हिवाळी सत्र २०२५ (ऑक्टोबर/नोव्हेंबर) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार हे निकाल जाहीर करण्यात येणार असले तरी ते अंतिम निर्णयाच्या अधीन असणार आहेत.

विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार संबंधित विद्यार्थ्यांचे निकाल यापूर्वी न्यायालयीन प्रकरणामुळे राखीव ठेवले होते. मात्र, याचिकेवर १६ मार्च २०२६ रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार, विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने हे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तथापि, न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर या निकालांचे भवितव्य अवलंबून राहणार असून, तो निर्णय सर्व संबंधितांना बंधनकारक असेल, असेही स्पष्ट केले आहे.

### कॅरी ऑन विद्यार्थ्यांची माहिती पाठवा

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाने विविध पदवी अभ्यासक्रमातील 'कॅरी ऑन' (विशेष संधी) अंतर्गत परीक्षा दिलेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती तातडीने सादर करण्याचे निर्देश संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून जारी केलेल्या पत्रानुसार, बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम, बी.सी.ए., बी.बी.ए., बी.कॉम बँक मॅनेजमेंट आणि बी.कॉम आयटी या अभ्यासक्रमांतील भाग-१ व भाग-२ मध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील वर्षात 'कॅरी ऑन' संधी दिली होती. या अंतर्गत ऑक्टोबर २०२५ मध्ये परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मागविली आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक व सीट नंबरसह संपूर्ण माहिती २८ फेब्रुवारीपर्यंत ई-मेलद्वारे विद्यापीठाकडे पाठविण्याच्या सूचना आहेत. ही माहिती वेळेत न पाठविल्यास पुढील प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.



### अर्ज भरून न घेण्याचे निर्देश

दरम्यान, या विद्यार्थ्यांकडून उन्हाळी सत्र २०२६ चे परीक्षा अर्ज सध्या भरून घेऊ नयेत, असे निर्देश विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालये व विभागांना दिले आहेत. न्यायालयाचा अंतिम आदेश आल्यानंतरच पुढील प्रक्रियेबाबत स्वतंत्र सूचना दिल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना या निर्णयाची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर सोपविली आहे.

04 APR 2026

तरूण भारत

# कॅरी ऑन विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत 'कॅरी ऑन' (विशेष प्रवेश संधी) योजनेतून प्रवेश घेऊन हिवाळी सत्र २०२५ (ऑक्टोबर/नोव्हेंबर) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार हे निकाल जाहीर करण्यात येणार असले तरी ते अंतिम निर्णयाच्या अधीन असणार आहेत. शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार संबंधित विद्यार्थ्यांचे निकाल यापूर्वी न्यायालयीन प्रकरणामुळे राखीव ठेवले होते. मात्र, याचिकेवर १६ मार्च २०२६ रोजी उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार, विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार विद्यापीठाने हे निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तथापि, न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर या निकालांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. दरम्यान, या विद्यार्थ्यांकडून उन्हाळी सत्र २०२६ चे परीक्षा अर्ज सध्या भरून घेऊ नयेत, असे निर्देश विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालये व विभागांना दिले आहेत. शिवाजी विद्यापीठाने विविध पदवी अभ्यासक्रमातील 'कॅरी ऑन' (विशेष संधी) अंतर्गत परीक्षा दिलेल्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती तातडीने सादर करण्याचे निर्देश संलग्नित महाविद्यालयांना दिले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांचे पीआरएन क्रमांक व सीट नंबरसह संपूर्ण माहिती २८ फेब्रुवारीपर्यंत ई-मेलद्वारे विद्यापीठाकडे पाठविण्याच्या सूचना आहेत. सर्व महाविद्यालयांनी तातडीने कार्यवाही करावी, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

04 APR 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण रुरल डेव्हलपमेंटच्या बांधकामास मान्यता

## ९ कोटींच्या अंदाजपत्रकासही मान्यता: मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नांतून निधी प्राप्त

**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाकडून सुमारे ९ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नांतून हा निधी प्राप्त झाला आहे.




शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०११-१२ मध्ये विद्यापीठास यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट हा विभाग महाराष्ट्र शासनाकडून मंजूर झाला. सदर योजनेअंतर्गत इमारतीचा तळमजला बांधण्यासाठी १० कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडून प्राप्त झाले. सदर अनुदानातून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तळमजल्याचे काम पूर्ण झाले. या इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर २०२५ मध्ये मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी या इमारतीच्या पहिल्या मजल्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार शासन निर्णय २५ मार्च २०२६ अन्वये ९ कोटी १९ लाख ४४ हजार ८२० रुपये इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. यामध्ये पहिल्या मजल्याचे अंदाजित २२,०५९ चौरस फुट इतके बांधकाम प्रस्तावित आहे. अनुदान मंजूर होण्यासाठी मंत्री श्री. पाटील यांच्यासह विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी,प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी पाठपुरावा केला. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्यापीठाचा अभियांत्रिकी विभाग,महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग आणि संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (पुणे) यांनीही प्रयत्न केले. यापूर्वी विद्यापीठास मंत्री पाटील यांच्याच पाठपुराव्याने फेब्रुवारी २०२३ मध्ये विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या कामासाठी सुमारे साडेआठ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती.

04 APR 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कागलच्या जैव विविधता उद्यानात कृत्रिम पाणवठे

**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर:** कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले आहेत. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्युकेशन सोसायटीतर्फे कागल येथे जैव विविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम चालू आहे. या ठिकाणी शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागाच्या वतीने पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्यात आली आहेत.

वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुड्डे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाणवठे तयार करण्यात आले. हिंदी अधिविभागातील डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले तसेच संशोधक, विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.



**कोल्हापूर : कागलच्या जैवविविधता उद्यानात श्रमदानातून तयार केलेले पक्षीतीर्थ.**

अमोल बुड्डे यांनी उपस्थितांना पक्ष्यांसाठी तयार घरटी वाटप केली व त्यांचे महत्व समजून सांगितले. यावेळी डॉ. दिलीप माळी यांनी जैव विविधता उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, प्रकल्पाचे भविष्यातील नियोजन, सामाजिक महत्व तसेच जैव विविधतेची गरज याबद्दल माहिती दिली. हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांना आभार मानले.

### श्रमदानातून पक्षीतिर्थ

तीव्र उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पक्ष्यांसह छोट्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने सार्थ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. त्यानुसार हिंदी अधिविभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उद्यानात श्रमदानातून दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले.

Marketmedia.



# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय




कोल्हापूर :

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या ८व्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०२५-२६ पार पडली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

या संघात अभय विजय हावळ, मुनाफ रियाज अहमद खान, सूरज महादेव कांबळे, स्नेहल सत्येंद्रकुमार चव्हाण, किरण सूर्यकांत भाकरे, तनुजा रावसाहेब कांबळे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, सुधांशू गौतम तांबे, विपश्यना भिकाजी कामत आणि निहाल अलनिसार रुकडीकर यांचा समावेश होता. संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले.

संघव्यवस्थापक म्हणून चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले आहे.

04 APR 2026

जनप्रवास



# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

**जनप्रवास : कोल्हापूर**

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या संघात अभय विजय हावळ, मुनाफ रियाज अहमद खान, सूरज महादेव कांबळे, स्नेहल सत्येंद्रकुमार चव्हाण, किरण सूर्यकांत भाकरे, तनुजा रावसाहेब कांबळे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, सुधांशू गौतम तांबे, विपश्यना भिकाजी कामत आणि निहाल अलनिंसार रुकडीकर यांचा समावेश होता. संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले.

## चषक आणि प्रमाणपत्रे

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिलरोजी कव्वाली स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

संघव्यवस्थापक म्हणून चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

04 APR 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





हैदराबाद : येथे झालेल्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ दुसऱ्या छायाचित्रात हैदराबाद येथील राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत सादरीकरण करताना शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिल रोजी राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा पार पडली.

संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले. संघव्यवस्थापक म्हणून चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले आहे.

## सहभागी संघ असे :

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. यामध्ये अभय विजय हावळ, मुनाफ रियाज अहमद खान, सूरज महादेव कांबळे, स्नेहल सत्येंद्रकुमार चव्हाण, किरण सूर्यकांत भाकरे, तनुजा रावसाहेब कांबळे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, सुधांशू गौतम तांबे, विपश्यना भिकाजी कामत आणि निहाल अलनिसार रुकडीकर यांचा समावेश होता.

04 APR 2026 सकाळ, जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू पदासाठी मुलाखतींना प्रारंभ

## मुंबईत प्रक्रिया : दहा उमेदवारांच्या झाल्या मुलाखती; उर्वरित टप्पा आज

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाच्या निवड प्रक्रियेने आता वेग घेतला आहे. अंतिम मुलाखतीसाठी पाच उमेदवारांच्या निवडीसाठी २५ उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया आजपासून मुंबईत सुरू झाली. त्याच्या पहिल्यादिवशी डॉ. आर. के. कामत, ज्योती जाधव, पी. एस. पाटील यांच्यासह दहा जणांच्या मुलाखती घेण्यात आल्या.**



कुलगुरू शोध समितीने ११५ अर्जांच्या प्राथमिक छाननी प्रक्रियेनंतर पहिल्या टप्प्यातील मुलाखतीसाठी २५ उमेदवारांची निवड केली. त्यांच्या मुलाखतीची प्रक्रिया या समितीने मुंबईतील ट्रायडेंट हॉटेलमध्ये आजपासून सुरू केली. सकाळी नऊ वाजल्यापासून प्रक्रिया सुरू झाली. दिवसभरात होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. एस. चव्हाण, आर. जी. सोनकवडे, नांदेडचे ए. एम. महाजन, एस. एस. कोळेकर, 'आयसीटी'चे डॉ. भगवान जोगी अशा दहा उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण झाली. उर्वरित उमेदवारांच्या मुलाखतींची प्रक्रिया उद्या, शनिवारी होईल. त्यानंतर कुलगुरू शोध समितीकडून अंतिम मुलाखतीसाठी पाच उमेदवारांची निवड करून त्यांची नावे राज्यपाल तथा कुलपती कार्यालयाला पाठविली जाणार आहेत.

### समितीने जाणून घेतली बारकाईने माहिती

■ कुलगुरू शोध समितीने मुलाखत घेताना प्रत्येक उमेदवाराशी २५ ते ३० मिनिटे चर्चा केली. त्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, विद्यापीठाचे व्यवस्थापन, परीक्षाविषयक कामकाज, नवे अभ्यासक्रम, कामकाजामध्ये नवतंत्रज्ञानाचा वापर आदींबाबत या उमेदवारांचे भविष्यातील व्हिजन, त्यांच्या वेगळ्या संकल्पना समितीने अगदी बारकाईने जाणून घेतल्या. उमेदवारांनी त्यांचे सादरीकरण करताना दिलेल्या कागदपत्रांचीदेखील यावेळी तपासणी करण्यात आली.

### दृष्टिक्षेपात

- ११५ अर्जांची प्राथमिक छाननी
- उर्वरित १५ उमेदवारांची मुलाखत आज
- प्रत्येक उमेदवाराशी २५ ते ३० मिनिटे संवाद
- भविष्यातील व्हिजन घेतले जाणून
- अंतिम मुलाखतीसाठी असणार पाच उमेदवार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 APR 2026 लोकमत

# कुलगुरुपदासाठी ज्योती जाधव, पी. एस. पाटील यांनी दिल्या मुलाखती

## राजभवनाकडून मुलाखती : पाच नावांची होणार शिफारस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी राजभवनाकडून उमेदवारांच्या मुलाखतींना शुक्रवारी मुंबईत प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस.एस. चव्हाण, डॉ. एस.एस. कोळेकर तसेच मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर.के. कामत यांच्या मुलाखती झाल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवडीसाठी निवड प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या टप्प्यात काही प्रमुख उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. उर्वरित उमेदवारांच्या मुलाखती आज, शनिवारीही सुरू राहणार आहेत. कुलगुरुपदासाठी एकूण ११५ अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जांची छाननी करून शोध समितीने २२ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी निश्चित करण्यात आल्या आहेत. राजभवनाकडून या २२ उमेदवारांच्या मुंबईत दोन ठिकाणी मुलाखती सुरू आहेत. त्यातून अंतिम पाच उमेदवारांच्या नावांची शिफारस कुलपती कार्यालयाकडे करण्यात येणार आहेत. त्यानंतर स्वत: कुलपती तथा राज्यपाल एका उमेदवाराची कुलगुरुपदावर नियुक्ती करणार आहेत. मुलाखत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरच नवीन कुलगुरूंची घोषणा होणार असून, शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### इतर विद्यापीठांतील नावे अशी :

डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. सतीश पाटील, डॉ. ए.एम. महाजन, डॉ. नितीन देसाई, डॉ. विजय खरे, डॉ. स्मिता देशमुख, डॉ. राजेश गच्चे, डॉ. बेलनकर, प्रा. डॉ. जोगी, एनआयटीचे राजेंद्र काकडे.

### शिवाजी विद्यापीठातील नावे

डॉ. आर.के. कामत, डॉ. ज्योती जाधव, डॉ. पी.एस. पाटील, एसएनडीटी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर, डॉ. एस.एस. चव्हाण, डॉ. आर.जी. सोनकवडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. एस.एस. कोळेकर, तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. संजय ढोले, डॉ. संजय चाकणे, दिल्ली विद्यापीठातील डॉ. विलास खरात.

0 4 APR 2026

पुढारी

# कुलगुरुपदासाठी निम्म्या उमेदवारांच्या मुलाखती पूर्ण

## पाच नावे आज राज्यपालांकडे सुपूर्द केली जाणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठीच्या २२ जणांच्या मुलाखतींना मुंबईत शुक्रवारी सुरुवात झाली. कुलगुरू शोध निवड समितीने शुक्रवारी निम्म्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही उमेदवारांच्या मुलाखती शनिवारी होणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ कुलगुरूंची निवड प्रक्रिया गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. अर्ज छाननीनंतर पात्र २२ उमेदवारांची यादी तयार करण्यात आली. त्यानंतर मुलाखतींना प्रारंभ झाला आहे. प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, डॉ. आर. के. कामत, डॉ. पी. एस. पाटील, आर. जी. सोनकवडे, डॉ. संजय चव्हाण, डॉ. संजय ढोले, गच्चे, हेगडे, नांदेडचे माने, खरात यांच्या मुलाखती शुक्रवारी झाल्या. दि. ४ एप्रिल रोजी काही पात्र उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत. मुलाखतींची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राज्यपालांकडे अंतिम पाच नावे सादर केली जाणार आहेत. राज्यपाल पाचजणांच्या मुलाखती घेऊन एकाची कुलगुरुपदी निवड करतील. नवीन कुलगुरू कोण होणार? याकडे विद्यापीठ वर्तुळाचे लक्ष लागले आहे.